Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 June 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ११ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- केंद्रीय मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर–ज्येष्ठ मंत्र्यांकडे पूर्वीची खाती कायम
- रक्षा खडसे यांच्याकडे युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय तर मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सहकार आणि हवाई वाहतूक खात्याची जबाबदारी
- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग–अजित पवार यांचा निर्वाळा

आणि

- परभणी तसंच लातूर जिल्ह्यात ढगफुटीसदृश्य पाऊस

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर करण्यात आलं. नरेंद्र मोदी यांच्या अखत्यारित कार्मिक, लोकतक्रार आणि निवृत्तीवेतन, अणुऊर्जा विभाग, अंतराळ विभाग, धोरणनिर्मितीसंबंधीचे मुद्दे आणि कोणत्याही मंत्र्याकडे सोपवला नसलेला विभाग असणार आहे. खातेवाटपाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***‘‘राजनाथसिंह यांच्याकडे संरक्षण, अमित शाह यांच्याकडे गृह आणि सहकार, नितीन गडकरी यांच्याकडे रस्ते वाहतूक आणि महामार्ग, निर्मला सीतारामन यांच्याकडे अर्थमंत्रालय आणि कंपनी व्यवहार तर एस. जयशंकर यांच्याकडे परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाची जबाबदारी पुन्हा सोपवण्यात आली आहे.***

***अश्विनी वैष्णव यांच्याकडे रेल्वेमंत्रालय कायम ठेवण्यात आलं असून, माहिती आणि प्रसारण तसंच माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचा कार्यभारही त्यांच्याकडे***

*सोपवण्यात आला आहे. गेल्या मंत्रिमंडळात माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री असलेले एल. मुरुगन यांच्याकडे हेच खातं ठेवण्यात आलं आहे.*

*पीयूष गोयल यांच्याकडे वाणिज्य आणि उद्योग तर धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे शिक्षण मंत्रालय कायम ठेवण्यात आलं आहे. जगत प्रकाश नड्डा यांच्याकडे आरोग्य आणि कुटुंबकल्याण तसंच रसायनं आणि खत मंत्रालय ही दोन खाती देण्यात आली आहेत.*

*केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेले मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे कृषी आणि ग्रामीण विकास, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच डी कुमारस्वामी यांच्याकडे अवजड उद्योग आणि पोलाद मंत्रालय, तर हरयाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल यांच्याकडे गृहनिर्माण,नागरी व्यवहार आणि ऊर्जा मंत्रालयाचा कार्यभार देण्यात आला आहे. बिहारचे माजी मुख्यमंत्री जीतनराम मांझी यांच्याकडे सूक्ष्म लघू आणि मध्यम उद्योग, तर आसामचे माजी मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याकडे बंदरे–नौवहन आणि जलमार्ग  मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.*

*पाच राज्यमंत्र्यांना स्वतंत्र पदभार देण्यात आला आहे. यात खासदार प्रतापराव जाधव यांचा समावेश आहे, त्यांच्याकडे आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र पदभार तसंच आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.*

*रामदास आठवले यांच्याकडे सामाजिक न्याय आणि सबलीकरण राज्यमंत्री म्हणून जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. रावेर लोकसभा मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा खासदार झालेल्या रक्षा खडसे यांच्याकडे युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पुण्यातून प्रथमच खासदार झालेले मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सहकार आणि हवाई वाहतूक मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.*

*याशिवाय ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे दूरसंचार आणि ईशान्य विकास*
*किरेन रिजीजू – संसदीय कामकाज, आणि अल्पसंख्याक विकास*

*राजीव रंजन सिंह – पंचायती राज तसंच मत्स्य–पशू संवर्धन आणि दुग्ध व्यवसाय*
*जुएल ओराम – आदिवासी कल्याण*
*चिराग पासवान– अन्न प्रक्रिया उद्योग*
*जी किशन रेड्डी– कोळसा आणि खनिकर्म*
*मनसुख मांडवीय – श्रम आणि रोजगार*
*भूपेंद्र यादव– पर्यावरण तर राम मोहन नायडू यांच्याकडे नागरी उड्डयन मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.''*

****

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपलं सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. काल पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर ते बोलत होते. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७वा हप्ता पंतप्रधानांनी काल जारी केला. या अंतर्गत ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २० हजार कोटी रुपये निधी थेट जमा होणार आहे.

**

पीएम आवास योजनेअंतर्गत देशभरात तीन कोटी घरं उभारली जाणार आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या पहिल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या घरांमध्ये शौचालय, घरगुती वापराचा गॅस, वीज जोडणी तसंच नळ जोडणी उपलब्ध असणार आहे. या योजनेअंतर्गत देशभरात गेल्या दहा वर्षांत चार कोटी २१ लाख घरांची उभारणी करण्यात आली आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एनडीए–राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग असल्याचा निर्वाळा, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय मंत्रीपदावरून काहीही नाराजी नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. स्वतंत्र प्रभाराच्या राज्यमंत्रिपदाचा प्रस्ताव एनडीएकडून मिळाला होता, मात्र आपण तो सध्या नाकारत, एनडीएसोबतच काम करत राहणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षस्थापनेसह पक्षविस्तारासाठी योगदान दिलेल्या सर्वांप्रती अजित पवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत काल पुणे तसंच अहमदनगर इथंही पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम पार पडले.

****

मुंबई क्रिकेट असोशिएनचे अध्यक्ष अमोल काळे यांचं अमेरिकेत न्यूयॉर्क इथे निधन झालं. भारत पाकिस्तान सामना पाहात असताना काळे यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तत्काळ रुग्णालयात हलवण्यात आलं, मात्र त्यादरम्यान त्यांचं निधन झालं.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ–सीबीएसईने आपला अभ्यासक्रम तसंच शैक्षणिक साहित्याबद्दल प्रसारित होणाऱ्या अफवांबाबत सावध राहण्याचं आवाहन विद्यार्थी तसंच पालकांना केलं आहे. यासंदर्भात मंडळाच्या संकेतस्थळावर दिली जाणाऱ्या सूचनांवर लक्ष द्यावं, असंही याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट या पात्रता परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करत, या प्रकरणाची सर्वंकष चौकशी करण्याची तसंच निकालाचं फेरमूल्यांकन करण्याची मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. असे गैरप्रकार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, असंही पटोले यांनी म्हटलं आहे.

****

खरीप हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणे आणि खतांचा पुरवठा तसंच प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले आहेत. ते काल यासंदर्भातल्या आढावा बैठकीत दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बोलत होते. खते–बियाण्यांच्या अभावी कुठंही पेरण्यांना विलंब होऊ नये, याची दक्षता घेण्याची सूचना पवार यांनी केली.

****

यंदाच्या खरीप हंगामासाठी बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज नूतनीकरणाचं महत्त्व पटवून देत, पीक कर्ज वितरणाला प्राधान्य द्यावं, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. जिल्ह्याच्या वार्षिक पत आराखड्याचं प्रकाशन काल स्वामी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यात यंदाच्या

आर्थिक वर्षासाठी २३ हजार १६२ कोटी रुपयांचा पत आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

****

मराठवाड्यात परभणी तसंच लातूर जिल्ह्यात काल ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. मानवत तालुक्यात मानोली शिवारात झालेल्या या पावसाने ओढ्याला पूर आला, त्यात दोन महिला वाहून गेल्या. यापैकी एका महिलेला वाचवण्यात यश आलं, तर सुनिता लव्हाळे नावाच्या महिलेचा रात्री उशीरापर्यंत शोध लागू शकला नाही.

लातूर शहरासह जिल्ह्यात जळकोट, उदगीर, चाकूर, अहमदपूर तालुक्यात काल मुसळधार पाऊस झाला. जळकोट तालुक्यातल्या अनेक भागात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला, परिणामी नदी शेत शिवारात पाणी साचलं आहे. प्रशासनाने जिल्ह्यातील नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे.

जालना जिल्ह्यातल्या घनसावंगी तालुक्यात काल सायंकाळी जोरदार पाऊस झाला. पहिल्याच पावसात पावसानं दमदार हजेरी लावल्यानं या भागात पाझर तलाव शंभर टक्के भरले आहेत. शेतांमध्ये सर्वत्र पाणी साचलं आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही काल जोरदार पाऊस झाला.

दरम्यान, शहराला पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्यानं, जालान नगर भागात काही दुकानं तसंच घरांमध्ये पाणी शिरुन नुकसान झालं.

****

मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर आगामी विधानसभा निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागतील असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी दिला आहे. जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं उपोषणाला बसलेले जरांगे काल वार्ताहरांशी बोलत होते. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना विरोध करु, तसंच विधानसभा निवडणुकीत सर्व जातीधर्माचे २८८ उमेदवार उभे करु, असं ते म्हणाले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीनं दहावी तसंच बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा काल गौरव करण्यात आला. समर्थ नगर इथल्या श्रीराम मंदिरात काल दुपारी झालेल्या या कार्यक्रमात सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

****

धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्र विभागाच्या वतीने १० जून ते १६ जून या कालावधीत राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत दृष्टीदिन सप्ताह राबवला जात आहे. डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतीप्रित्यर्थ असलेल्या या सप्ताहाला कालपासून प्रारंभ झाला.

****